**पुढील सरतपास तक्रारदारतर्फे विधिज्ञ व्ही.आर.देशपांडे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१२. नि.क्र.यु.डब्लु—१ वरील लेखी सरतपासातील सर्व मजकूर हा माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावरती माझी सही आहे.

**उलटतपास सामनेवालातर्फे विधिज्ञ बी.टी.पवार यांचेमार्फत सुरु.**

१३. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात मी सामनेवाला यांनी मला रू.५,१००/— पगार दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. माझे वडील थाऊ राठोड हे सामनेवाला ग्रामपंचायतीमध्ये २० वर्षे कामास होते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी प्रकरणात दाखल केलेला नाही. माझ्या वडीलांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या जागी मी सामनेवाला ग्रामपंचायतीमध्ये कामास लागलो हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. प्रस्तुत प्रकरणात मी सामनेवाला ग्रामपंचायतीकडे कामास असताना प्रत्येकवर्षी २४० दिवस सलगसेवा केली आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, सरपंच कमला राठोड यांनी मला अनेकवेळा सांगितले होते की, मी गावामध्ये गोंधळ, दंगा करू नये. हे म्हणणे खरे नाही की, मी कामावर सतत जात नव्हतो आणि माझे कामामध्ये लक्ष नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सरपंच आणि ग्रामसेवक यांना मी आरवाच्च भाषेत शिवीगाळ करून उध्दट बोललो. हे म्हणणे खरे नाही की, सरपंच आणि ग्रामसेवक यांनी माझ्या चुकीच्या वर्तनाबाबत मला अनेकवेळा समजुन सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी दारू पिऊन आत्मदहनाच्या धमक्या देत होतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. १३/१२/२०२२ रोजी मी जिल्हाधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना पत्र लिहुन आत्मदहनाचा इशारा दिला होता. *साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, कामावरून काढल्यामुळे आर्थिक परिस्थिती बिकट झाली होती आणि त्यामुळे नाईलाजाने त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिला होता.* हे म्हणणे खरे नाही की, आत्मदहनाचा इशारा देऊन जिल्हाधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्यावर मी दबाव आणला होता.

हे म्हणणे खरे नाही की, मी दारू पिऊन ग्रामपंचायतीमधील वस्तुंची विक्री केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दारू पिऊन उध्दटपणे कामावर आल्यामुळे ग्रामपंचायतीने मला कामावरून कमी केले. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत आणि ग्रामसेवक यांनी दि.३१/०३/२०२३ रोजीचा ठराव करून प्रोसीडिंग बुकमध्ये अशी नोंद केली की, मी १७ महिन्यापासून गैरहजर आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, गटविकास अधिकारी यांनी गावामध्ये २४ पंचांना बोलवुन माझी चौकशी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामसेवक आणि सरपंच यांनी नोटीस दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दि. १६/१२/२०२२ रोजी गटविकास अधिकारी यांनी सरपंच आणि ग्रामसेवक यांना पत्र देऊन माझी चौकशी करण्यास सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. १८/०१/२०२३ रोजी ग्रामसेवक व सरपंच यांच्या उपस्थितीत गटविकास अधिकारी यांच्यासमोर माझी चौकशी झाली होती.

१६. हे म्हणणे खरे नाही की, मला सामनेवाला यांनी नोटीस देऊन कळवले होते की, बेजबाबदारपणामुळे मला कामावरून कमी करण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दारू पिल्यामुळे, कामावर वेळेवेर हजर न झाल्यामुळे आणि ग्रामसेवक आणि सरपंच यांच्याशी उध्दट वर्तन केल्यामुळे सामनेवाला यांनी मला कामावरून कमी केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

KALYANI RAJARAM ADAKE
Digitally signed by KALYANI RAJARAM ADAKE
Date: 2025.11.20 17:39:14 +0530

(क. रा. आडके)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सोलापूर.

सोलापूर.
दिनांक : २०/११/२०२५